एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत मुख्यसेविकांचे कार्यक्षेत्र (बीट) निश्चित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन परिपत्रक क्र.एबावि-२०१३/प्र.क्र.३१८/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० ऑगस्ट, २०१३

वाचा :- १) केंद्र शासनाचे पत्र क्र.N-१-३/२००२-CD-(VOl.III), दिनांक २२.०८.२००३
२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.एबावि-२००३/प्र.क्र.४३८/का.६, दिनांक १४ जानेवारी, २००४

**शासन परिपत्रक :-** केंद्र शासन महिला व बाल विकास यांचे आदेश क्र.N-१-३/२००२-CD-(Vol.III) दिनांक २२.०८.२००३ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालयातील कर्मचा-यांचा नव्याने सुधारीत आकृतीबंध लागू करण्यात आलेला आहे. या सुधारीत आकृतीबंधाप्रमाणे मुख्यसेविकेच्या कार्यक्षेत्रात बदल करण्यात आलेला असून एका मुख्यसेविकेकडे २५ अंगणवाडी केंद्रांचे पर्यवेक्षण निश्चित करण्यात आले आहे. सदर केंद्र शासनाचे सुधारीत आकृतीबंधापूर्वी आदिवासी क्षेत्रात १७ अंगणवाडी केंद्र, ग्रामीण क्षेत्रात २० अंगणवाडी केंद्र व नागरी क्षेत्रात २५ अंगणवाडी केंद्र असे कार्यक्षेत्र होते. केंद्र शासनाचे सुधारीत निकषाप्रमाणे सर्व क्षेत्रात २५ अंगणवाडी केंद्र एवढे कार्यक्षेत्र, मुख्यसेविकेसाठी निश्चित करण्यात आले आहे.

राज्यातील सद्य:स्थितीचा आढावा घेतला असता, असे निदर्शनास आले आहे की, ब-याच प्रकल्पात मुख्यसेविकेचे कार्यक्षेत्र १५ अंगणवाडी, २० अंगणवाडी, ३० अंगणवाडी, काही ठिकाणी ४० पेक्षा जास्त अंगणवाडी केंद्र असे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कामकाजाची विभागणी योग्य प्रकारे झालेली नसून पर्यवेक्षण व मासिक प्रगती अहवाल तयार करण्यामध्ये मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येते. तसेच केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषांची अंमलबजावणी होत नसल्याचेही दिसून येते.

याबाबत सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी / ग्रामीण / आदिवासी प्रकल्प) यांना निर्देश देण्यात येत आहेत की, २५ अंगणवाडी केंद्रे हे एका मुख्यसेविकेचे कार्यक्षेत्र याप्रमाणे सर्वत्र बीटची पुनर्रचना करण्यात यावी. असे करतेवळी एखाद्या बीटमध्ये २५ पेक्षा कमी अथवा जास्त अंगणवाडी केंद्र असा बदल करणे त्या बीटची भौगोलिक रचना

श्री मुंडे साहेब
MS
02.09
Email
02/09/2013
उपआयुक्त (प्रशासन/अंगणवाडी)
3/9

GR 2013.doc

Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)

विचारात घेता आवश्यक सोईचे होत असेल तरच थोडाफार बदल करता येऊ शकेल. परंतु हा बदल वजा (-) ५ अधिक (+) ५ एवढयापुरताच मर्यादित असावा. उदा. एखाद्या मुख्यसेविकेच्या बीटमध्ये २५ पेक्षा जास्त परंतु ३० पर्यंतच अंगणवाडी केंद्र तर काही बीटमध्ये २० पेक्षा जास्त, २५ पेक्षा कमी अंगणवाडी केंद्र असून शकतील.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या www.icds.gov.in या संकेतस्थळावर MPR या बटनावर मासिक प्रगती अहवाल नियमितपणे ठेवण्यात येतात व त्यातील format-I मध्ये मंजूर अंगणवाडी केंद्र व मंजूर मुख्यसेविकांची स्वतंत्र पदे ही माहिती दर्शविलेली असते त्याप्रमाणे प्रकल्पाची मंजूर संख्या विचारात घ्यावी. अशा प्रकारची बीटची विभागणी करतेवेळी मिनी अंगणवाडी केंद्राकरीता मुख्यसेविकेची स्वतंत्र पदे मंजूर केलेली नाहीत. त्यामुळे निर्धारित करण्यात येत असलेल्या बीटअंतर्गत येणारी मिनी अंगणवाडी केंद्र पर्यवेक्षणासाठी अथवा अहवालासाठी त्या बीटच्या मुख्यसेविकेकडेच असतील.

अशा प्रकारच्या बीटच्या पुनर्रचनेबाबत यापूर्वी राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन अथवा इतर विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय, परिपत्रक व आदेश या परिपत्रकाद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०८३०११५५३९९२३० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(मि. पा. पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री /राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री / राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधान भवन, मुंबई
आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व विभागीय उपआयुक्त (महिला व बाल विकास)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग, व्यय-६, मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभाग, कार्या.४/५,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद.
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती कार्या.६



Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)